**International Journal of Advance and Applied Research**
**Peer Reviewed | International Open Access Journal**
**ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.141 | Website: https://ijaar.co.in/**
***Volume-13, Issue-3 | January – February 2026***

**Original Article**

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंमलबजावणीतील आव्हाने आणि संधी

**प्रा. प्रतिभा चंद्रकांत क्षीरसागर**

*राज्यशास्त्र विभाग.वसंतराव काळे महाविद्यालय, ढोकी ता.जि.धाराशिव.*

**Manuscript ID:** IJAAR-B130394
**ISSN: 2347-7075**
**Impact Factor – 8.141**

**Volume - 13**
**Issue - 3**
**January – February 2026**
**Pp. 604 - 609**

**Submitted:** 23 Jan.2026
**Revised:** 07 Feb. 2026
**Accepted:** 15 Feb. 2026
**Published:** 28 Feb. 2026

***Corresponding Author:***
*प्रा. प्रतिभा चंद्रकांत क्षीरसागर*

Quick Response Code:

**Website:** https://ijaar.co.in/

DOI: 10.5281/zenodo.20322798

DOI Link: https://doi.org/10.5281/zenodo.20322798

Creative Commons

OPEN ACCESS

***सार:***

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 हे 21 व्या शतकातील भारताचे पहिले शैक्षणिक धोरण आहे. 2015 मध्ये स्वीकारलेल्या कृती विकासाच्या 2023 च्या कृती उद्दिष्टामध्ये 'जागतिक शिक्षण विकास कृती कार्यक्रम' 'समाविष्ट असून हे उद्दिष्ट 2030 पर्यंत सर्वांसाठी सर्वसमावेशक शिक्षण आणि समान गुणवत्तेची शिक्षण प्राधान्याने देणे या उद्देशाने हे नवीन शैक्षणिक धोरण मांडण्यात आले आहे. या नवीन शैक्षणिक धोरणांमधील अंमलबजावणी, संधी ,आव्हाने यांचा थोडक्यात आढावा सदरील शोध निबंधामध्ये घेण्यात आला आहे.

***मुख्य शब्द: राष्ट्रीय शिक्षण, गुणवत्ता, संधी , आव्हाने, कृती आराखडा आदी.***

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
***This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International License (CC BY-NC-SA 4.0),*** *which permits others to remix, adapt, and build upon the work non-commercially, provided that appropriate credit is given and that any new creations are licensed under identical terms.*

***How to cite this article:***
*प्रा. प्रतिभा चंद्रकांत क्षीरसागर. (2026). राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंमलबजावणीतील आव्हाने आणि संधी. International Journal of Advance and Applied Research, 13(3), 604 - 609.* https://doi.org/10.5281/zenodo.20322798

**प्रस्तावना**:

जगामधील मानव जातीच्या विकासासाठी त्यांच्यामध्ये असणाऱ्या गुणांना , क्षमतांना चालना देण्यासाठी शिक्षण हा एक प्रभावी असा मार्ग आहे. त्यामुळे प्रत्येक देश आपल्या राष्ट्रीय विकासासाठी देशातील नागरिकांना साक्षर, कुशल बनवण्यासाठी सतत प्रयत्नशील असतो त्यामधूनच नवनवीन शैक्षणिक धोरणांचा आराखडा तयार करण्यात येत असतो. भारत देशामध्ये पुढील दशकात जगातील सर्वात मोठी युवकांची लोकसंख्या असणारा आहे त्यामुळे त्या सर्वांना चांगल्या गुणवत्तेच्या शिक्षणाच्या संधी मिळाव्या म्हणून नवीन शैक्षणिक धोरण मांडण्यात आले आहे. ज्ञानाच्या बाबतीत जगामध्ये रोज नव-नवीन बदल घडत आहेत, त्यामध्ये बिग डाटा, मशीन लर्निंग, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) यासारख्या विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा विकास होत आहे तसेच विज्ञान,

International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.141 | Website: https://ijaar.co.in/
Volume-13, Issue-3 | January – February 2026

समाजशास्त्र, मानसशास्त्र यामध्ये होणारे बदल तसेच हवामान , अवकाश या क्षेत्रातील प्रगती तसेच अलीकडे आरोग्य विषयक वाढणाऱ्या समस्या त्यावरील संशोधन उपाय या सर्व क्षेत्रांमध्ये आवश्यक असणारे ज्ञान भारतीय युवा पिढीकडे असणे गरजेचे आहे, त्यामुळे शैक्षणिक व्यवस्था मध्ये बदल करणे, शैक्षणिक व्यवस्थेचा विकास करणे आवश्यक आहे. तसेच शिक्षणामुळे केवळ आर्थिक, सामाजिक विकास घ घडत असतो असे नाही शिक्षणामुळे चारित्र्य घडले जाते . पुढे शिकणारी पिढी नीतिमान ,तर्कशुद्ध सहानभूतीशील बनते, अशा युवकांना लाभदायक आणि समाधानकारक रोजगार मिळवण्यासाठी मदत होते त्या अनुषंगाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 हे मांडण्यात आले आहे.हे धोरण 34 वर्षानंतर मांडण्यात आले. या अगोदर राष्ट्रीय शैक्षणिक धोरण **1986** च्या कृती कार्यक्रम यामध्ये सुधारणा करून **1992** चे राष्ट्रीय धोरण मांडण्यात आले. या धोरणामध्ये पूर्ण न झालेली कामे पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करण्यात आले त्यानंतर पुढे अधिनियम 2009 यानुसार निशुल्क आणि अनिवार्य शिक्षण याद्वारे प्राथमिक शिक्षण साध्य करण्यासाठी कायदेशीर आधार उपलब्ध झाला.

नवीन शैक्षणिक धोरण( NEP) 2020 नुसार विद्यार्थी कुठेही राहत असले तरी त्यांना चांगल्या गुणवतीचे शिक्षण व्यवस्था पुरवणे समान, सर्वसमावेशकता ,सामाजिक, आर्थिक गतिशीलता साध्य करण्यास मदत करणारे आहे या धोरणांमध्ये प्रत्येक विद्यार्थ्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण क्षमता शोधणे, मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान, अध्ययनाचा लवचिकपणा, बहुपर्यायी समग्र शिक्षण, बहुभाषिकत्व शिक्षण आणि प्राध्यापक ,शिक्षक हे केंद्र मांडणारे सातत्यपूर्ण आढावा घेणारे हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आहे .भारतीय संस्कृती समृद्धीची ओळख प्रामुख्याने या तत्त्वाचाही सहभाग या शैक्षणिक धोरणामध्ये करण्यात आला आहे.

यापूर्वी प्राथमिक स्तरावर शैक्षणिक आकृतीबंध 10+2+3 अशा स्वरूपाचा होता परंतु यामध्ये बदल होऊन तो आता 5+3+3+4 अशा स्वरूपाचा करण्यात आला आहे यामध्ये वय वर्ष 3-6 अंगणवाडी किंवा पूर्व प्राथमिक शिक्षण 2 वर्षाचे वय वर्ष 6-8यामध्ये इयत्ता पहिली आणि दुसरी 2 वर्ष, वय वर्ष 8 - 11 इयत्ता तिसरी ते पाचवी तसेच पुढे वय वर्ष 11 - 14 इयत्ता सहावी ते आठवी तर वय वर्ष 14- 18 इयत्ता नववी ते बारावी अशी चार वर्षे अशा हा आकृती बंद आहे. विखुरलेल्या उच्च शैक्षणिक परिसंस्था , आकरणावर अधिक भर देणारे शिक्षण शैक्षणिक शाखेचा साचेबंदपणा, पदवीपूर्व शिक्षणाचा खालावलेला दर्जा या त्रुटीमध्ये सुधारणा करण्याचा प्रयत्न या नवीन शैक्षणिक धोरणामध्ये करण्यात आला आहे.

**4 शोध निबंधाचे उद्दिष्ट्ये:**

- नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा धोरणाचा अभ्यास करणे.
- राष्ट्रीय शैक्षणिक धोरणची (NEP) 2020 अंमलबजावणीचे स्वरूप अभ्यासणे.
- नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण(NEP) संधी आणि आव्हाने यांचा अभ्यास करणे .

**5 गृहीतकृत्ये:**

- भारतात राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी सुरू झाली आहे.
- राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये अनेक संधी आहेत.
- राष्ट्रीय शैक्षणिक धोरणासमोर अनेक आव्हाने आहेत.

**6 संशोधन पद्धती:** सदरील शोध निबंध लिहीत असताना द्वितीय साधनसामग्रीचा आधार घेण्यात आला आहे. त्यामध्ये संदर्भ ग्रंथ, शासकीय अहवाल, गॅझेट्स, पुस्तके, मासिके,

International Journal of Advance and Applied Research
Peer Reviewed | International Open Access Journal
ISSN: 2347-7075 | Impact Factor – 8.141 | Website: https://ijaar.co.in/
Volume-13, Issue-3 | January – February 2026

साप्ताहिके, दैनिक व वेबसाईटचा आधार घेण्यात आलेला आहे.

या संशोधनामध्ये द्वितीय साधनांचा आधार घेण्यात आलेला आहे.

**7 राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे स्वरूप:** शिक्षण प्रणाली मधील दोष दूर करण्यासाठी निवृत्त सचिव श्री. सुब्रमण्यम यांच्या अध्यक्षतेखाली एका समितीचे गठन करून त्या समितीचा अहवाल 2017 मध्ये राष्ट्रीय शिक्षण मंत्रालयाला सुपूर्त करण्यात आला. या आराखड्यावरून नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण ठरवण्यासाठी इसरो संस्थेचे निवृत्त प्रमुख डॉ. कस्तुरीरंमन यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली. हे धोरण भारत सरकारच्या मिनिस्ट्री ऑफ एज्युकेशन यांच्या अंतर्गत विकसित करण्यात आले हे धोरण ठरवीत असताना मोठ्या प्रमाणात सार्वजनिक सल्लामसलत लोक तसेच ग्रामपंचायत स्तरापर्यंत विचार विनिमय मते यांचा आधार घेण्यात आला पुढे केंद्रीय मंत्रिमंडळ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली हे धोरण मंजूर करण्यात आले राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 हे प्रत्यक्ष लागू लगेच करण्यात आले. पण कंटिन्यू प्रोसेस म्हणजेच सतत चालणारे आहे. या धोरणाची काही प्रमाणात अंमलबजावणी करणारे पहिले राज्य म्हणजे कर्नाटक राज्य (2020-21 ) आहे.

महाराष्ट्रामध्ये या धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी सुकाणू समितीची स्थापना करण्यात आली, त्यानुसार शैक्षणिक वर्ष 2023- 24 मध्ये 150 महाविद्यालयातून या धोरणाची अंमलबजावणी सुरू झाली आहे. ‘बहुशाखीय शिक्षण’ हे या धोरणाचा आत्मा आहे. तसेच कौशल्यावर आधारित शिक्षण, ऑन जॉब ट्रेनिंग, इंटरशिप, भारतीय ज्ञानसंपदा, मूल्याधिष्ठित शिक्षण, मातृभाषेतून शिक्षण हे या धोरणाचे वैशिष्ट्य आहेत, तर ‘शिक्षण द्या ,प्रोत्साहन द्या आणि प्रबोधन करा’ ही या धोरणाची त्रिसूची आहेत.

**8 राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची पंचसूत्रे:**

1. प्रवेश
2. समता
3. गुणवत्ता
4. परवडणारे शिक्षण
5. उत्तरदायित्व

**अंमलबजावणी**:

1. दर्जेदार विद्यापीठ आणि महाविद्यालय स्थापन करणे .
2. संस्थांची पुनर्रचना आणि बळकटीकरण करणे: यामध्ये 3000 किंवा त्यापेक्षा जास्त विद्यार्थी असणारे महाविद्यालय किंवा विद्यापीठे यांचे नॉलेज हब तयार करणे श्रेणीबद्ध अधिस्वीकरित स्वायत्तता महाविद्यालयांना देणे तसेच बहुशाखीय महाविद्यालय स्थापन करण्यासाठी प्रयत्न करणे
3. अधिक सर्वांगीण आणि बहुशाखीय शिक्षणाच्या दिशेने वाटचाल करणे
4. आंतरराष्ट्रीयकरण: आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांचे प्रमाण वाढविणे ,भारतीय विद्यार्थ्यांना परदेशी संस्थांना भेट देण्याच्या संधी उपलब्ध करून देणे, आंतरराष्ट्रीय स्वरूपामध्ये आंतरराष्ट्रीय संस्थांमध्ये शिक्षण घेण्याच्या संधी उपलब्ध करून देणे तसेच भारतीय विद्यापीठे व महाविद्यालय यांना इतर देशांमध्ये कॅम्पस स्थापन करण्याची साठी प्रोत्साहन करणे तसेच परदेशी शिक्षण संस्थांना भारतामध्ये कार्यरत होण्यासाठी मदत करणे

5. विद्यार्थ्यांचा उपक्रम मध्ये सहभाग: विद्यार्थ्यांना क्रीडा, सांस्कृतिक, कला, पर्यावरण क्लब, समाजसेवा प्रकल्प यामध्ये सहभागी होण्यास संधी देणे. भावनिक ताणतणाव हाताळण्यासाठी शिक्षण संस्थांमध्ये समुपदेशन यंत्रणा उभा करणे . ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना वसतिगृहासारख्या सुविधा उपलब्ध करणे.
6. विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य देणे: राष्ट्रीय शिष्यवृत्ती पोर्टलचा विस्तार, मोठ्या महाविद्यालयांना शुल्क माफी आणि शिष्यवृत्ती देण्यासाठी प्रोत्साहन देणे.
7. प्रेरित, उत्साही सक्षम शिक्षक , प्राध्यापक वर्ग: अद्यावत शैक्षणिक तंत्रज्ञान, भौतिक सुविधांचा पुरवठा करणे, अध्यापनामध्ये प्राध्यापक ,शिक्षक स्वातंत्र्य प्रदान करणे, योग्य पुरस्कार, पदोन्नती, सन्मान याद्वारे प्रोत्साहन देणे .
8. उच्च शिक्षणातील समता आणि समावेशकता: यामध्ये लिंगभेद समस्या निराकरण, दिव्यांगासाठी भौतिक सुविधांची सोय तसेच उच्च शिक्षणामध्ये विद्यार्थ्यांना रोजगार संधी उपलब्ध करून देणे .
9. शिक्षकांचे शिक्षण: नवीन राष्ट्रीय शैक्षणिक फाउंडेशनच्या माध्यमातून दर्जेदार शैक्षणिक संशोधनाला चालना देणे ,उच्च शिक्षणाचे नियमित प्रणालीमध्ये बदल करणे तसेच शिक्षणाच्या व्यापारीकरणावर अंकुश ठेवणे यामध्ये शैक्षणिक फी माफक स्वरूपामध्येच आकारल्या जातील यासाठी काळजी घेणे तसेच उच्च शिक्षणामध्ये प्रभावी व्यवस्थापन आणि नेतृत्व यावर देखील भर देण्यात आलेला आहे.

**संधी:**

या नवीन धोरणाद्वारे विद्यार्थी- शिक्षक यांना वेगवेगळया संधी उपलब्ध झालेले आहेत

1. बहुशाखीय ज्ञान मिळवण्याची संधी उपलब्ध झालेली आहे.
2. आंतरराष्ट्रीय स्वरूपाची शिक्षण घेण्याची संधी या धोरणामध्ये उपलब्ध झालेली आहे. .
3. विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच व्यावसायिक शिक्षण घेण्याची संधी या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे प्राप्त झालेली आहे.
4. तज्ञ, अनुभवी शिक्षकांचे मार्गदर्शन ऑनलाईन पद्धतीने प्राप्त करता येणार आहे.
5. गुणवत्तापूर्ण ,समान व सर्वसमावेशक शिक्षणाची हमी या शैक्षणिक धोरणामध्ये आहे.
6. प्राध्यापकांच्या संशोधनाला चालना देण्याची संधी या शैक्षणिक धोरणामध्ये आहे.
7. अलीकडील काळामध्ये शिक्षणाच्या जे व्यापारीकरण झाले आहे त्याला कुठेतरी आळा घालण्याचा प्रयत्न या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांमधून दिसून येतो.
8. प्रभावी दर्जेदार आंतरराष्ट्रीय स्वरूपाचे महाविद्यालय व विद्यापीठे यामधून शिक्षण घेण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळणार आहे

   भारतीय ज्ञानाचा प्रसार भारतीय विद्यापीठे महाविद्यालय यांच्यामार्फत जगभरामध्ये पोहोचण्यास सुरुवात होऊ शकते.

   या शैक्षणिक धोरणामध्ये विद्यार्थ्यांच्या आवडीनुसार शिक्षणाची संधी तसेच मातृभाषा, प्रादेशिक भाषा, **आंतरराष्ट्रीय भाषा** यांना ही महत्त्व देण्यात आलेले आहे.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरणा समोरील आव्हाने:**

1. भौतिक सोयी सुविधा व साधनसामुग्रीचा अभाव सध्याच्या काळामध्ये आहे तसेच ग्रामीण व दुर्गम भागामध्ये संगणक इंटरनेट सुविधांचा पाहिजे तेवढा प्रसार आजही झालेला नाही त्यामुळे हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राबवत असताना या अडचणींना तोंड द्यावे लागणार आहे .

   आधुनिक उपकरणे अशा भागामध्ये उपलब्ध करणे हे एक आव्हान आहे
2. ग्रामीण व शहरी भागामधील महाविद्यालयामध्ये असणारी गुणवत्ता किंवा शैक्षणिक इतर बाबींमध्ये असणारी असमानता यामुळे हे शैक्षणिक धोरण राबवताना गुणवतीतील असमानता हे एक आव्हान असणार आहे
3. NEP नुसार बहुभाषिक आहे त्यासाठी आवश्यक असणारे भाषिक कौशल्य सर्व प्राध्यापक ,शिक्षक वर्गाकडे असेल असे नाही
4. सातत्यपूर्ण मूल्यांकन यामुळे विद्यार्थ्यांना सतत परीक्षा द्याव्या लागणार आहेत त्यामुळे संपूर्ण शैक्षणिक वर्ष ही परीक्षा देण्यातच जाईल याविषयी संभ्रम आहे
5. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण प्राध्यापक व इतर शिक्षक वर्गांना समजण्यासाठी किचकट आहे
6. या शैक्षणिक धोरणामध्ये आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या शिक्षणाला देखील महत्त्व देण्यात आले आहेत त्यामुळे भारतीय विद्यार्थ्यांमध्ये विदेशी शिक्षणाची भुरळ पडू शकते
7. बहुभाषिक यामुळे सर्व राज्यांना एकसारखे शैक्षणिक धोरण अमलात आणणे सर्व राज्यांना कठीण जाणार आहे.

**सारांश** :

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 हे नव्या दशकातील शैक्षणिक धोरण आहे यामध्ये शिक्षण क्षेत्रामध्ये बदल व विकास करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात येणार आहेत. यामध्ये कौशल्यपूर्ण शिक्षण' मातृभाषा 'प्रादेशिक भाषा यांना महत्त्व देण्यात आले आहे. तसेच या शैक्षणिक धोरणांमध्ये ऑनलाईन शिक्षणाला महत्त्व देण्यात आले आहे .उच्च शिक्षणामध्ये मधील मुख्य बाब म्हणजे बहुशाखीय महाविद्यालये तसेच बास्केट विषय म्हणजेच कला ,विज्ञान ,वाणिज्य शाखेमध्ये शिकणारा विद्यार्थी इतर दोन शाखांमधील कोणत्याही विषयाचे शिक्षण घेऊ शकतो, त्याबरोबर या शैक्षणिक धोरणापुढे अनेक समस्याही आहेत .प्रत्यक्ष या धोरणाच्या अंमलबजावणी करणे कठीण आहे .शिक्षक प्राध्यापक, विद्यार्थी यांच्यामध्ये या धोरणाची स्पष्ट स्वरूपाची माहिती नाही तसेच हे धोरण संपूर्ण देशांमध्ये समान व सारख्या स्वरूपामध्ये लागू करणे कठीण आहे या धोरणामुळे राज्य व केंद्र सरकार यांच्यामध्ये मतभेद निर्माण झाले आहेत असे असूनही या धोरणांमधून दुरस्थ, शिक्षण व्यवसायिक शिक्षण, आवडीचे शिक्षण घेणे, रोजगाराभिमुख शिक्षणासारख्या संधी प्राप्त होणार आहेत.

**संदर्भ ग्रंथ सूची:**

1. राष्ट्रीय शिक्षण धोरण- 2020 शिक्षण मंत्रालय भारत सरकार, नवी दिल्ली (www. education.gov.in)
2. उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र राज्य यांचे वार्षिक मासिक(2026) शिक्षण वेध: 2047 वेद विकसित शिक्षणाचा नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 आणि विकसित भारताचा पाया प्रा. डॉ .नितीन करमळकर. मा.

माजी. कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे सुकाणू समितीचे अध्यक्ष .

3. प्रा. डॉ. बाळासाहेब मैंद सर, लेख-भारताच्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा आकृती बंदअर्थशास्त्र विभाग प्रमुख वसंतराव काळे महाविद्यालय, ढोकी
4. लोकसत्ता संग्रहित लेख-6 ऑगस्ट 2025